# श्रीमद्भागवत रसिक कुटुंब

## श्रीमद्भगवद्गीता अष्टम् अध्याय मराठी

श्रीमद् भागवत का यह सार
भगवद् भक्ति ही आधार



पार्थ सारथी ने समझाया धर्म -कर्म का ज्ञान,
मानव जीवन सफल बना ले गीता अमृत मान।

नारायणं(न्) नमस्कृत्य, नरं(ञ्) चैव नरोत्तमम्।
देवीं(म्) सरस्वतीं(वँ) व्यासं(न्), ततो जयमुदीरयेत्

अन्तर्यामी नारायण स्वरूप भगवान् श्रीकृष्ण, (उनके नित्य सखा) नरस्वरूप नरश्रेष्ठ अर्जुन, (उनकी लीला प्रकट करनेवाली) भगवती सरस्वती और (उन लीलाओं का संकलन करनेवाले) महर्षि वेदव्यास को नमस्कार करके जय के साधन वेद-पुराणों का पाठ करना चाहिये।

नामसङ्कीर्तनं(यँ) यस्य, सर्वपापप्रणाशनम्।
प्रणामो दुःखशमनस्, तं(न्) नमामि हरिं(म्) परम्

जिन भगवान के नामों का संकीर्तन सारे पापों को सर्वथा नष्ट कर देता है और जिन भगवान के चरणों में आत्मसमर्पण, उनके चरणों में प्रणति सर्वदा के लिए सब प्रकार के दुःखों को शांत कर देती है, उन्हीं परम -तत्वस्वरूप श्रीहरि को मैं नमस्कार करता हूं।

श्रीमद्भगवद्गीतायां(म्)

अथाष्टमोऽध्यायः

अर्जुन उवाच

किं(न्) तद्ब्रह्म किमध्यात्मं(ङ्), किं(ङ्) कर्म पुरुषोत्तम ।
अधिभूतं(ञ्) च किं(म्) प्रोक्त- मधिदैवं(ङ्) किमुच्यते ॥ 1 ॥

अर्जुन म्हणाला ,हे पुरुषोत्तम !ते ब्रह्म काय आहे?अध्यात्म काय आहे ?कर्म काय आहे? अधिभूत शब्दाने काय सांगितले आहे ?आणि अधिदैवकशाला म्हणतात ?

अधियज्ञः(ख्) कथं(ङ्) कोऽत्र, देहेऽस्मिन्मधुसूदन।
प्रयाणकाले च कथं(ञ्), ज्ञेयोऽसि नियतात्मभिः ॥ 2 ॥

हे मधुसूदना !येथे अधियज्ञकोण आहे ?आणि तो या शरीरात कसा आहे ?तसेच अंतकाळी युक्त चित्ताचे पुरुष तुम्हाला कसे जाणतात ?

**श्रीभगवानुवाच**

**अक्षरं(म्) ब्रह्म परमं(म्), स्वभावोऽध्यात्ममुच्यते ।**

**भूतभावोद्भवकरो, विसर्गः(ख्) कर्मसञ्ज्ञितः ॥ 3 ॥**

श्री भगवान म्हणाले,परम अक्षर ब्रह्म आहे . आपले स्वरूप अर्थात जीवात्मा अध्यात्म नावाने सांगितला जातो . तसेच भूतांचे भाव उत्पन्न करणारा जो त्याग आहे "तो कर्म या नावाने संबोधला जातो .

**अधिभूतं(ङ्) क्षरो भावः(फ्), पुरुषश्चाधिदैवतम् ।**

**अधियज्ञोऽहमेवात्र, देहे देहभृतां(व्ँ) वर ॥ 4 ॥**

उत्पत्ती-विनाश असलेले सर्व पदार्थ'अधिभूत'आहेत.हिरण्यमय पुरुष अधिदेव आहे आणि हे देहधाऱ्यांमध्ये श्रेष्ठ अर्जुना ! या शरीरात मी वासुदेवच अंतर्यामी रूपाने अधी यज्ञ आहे .

**अन्तकाले च मामेव, स्मरन्मुक्त्वा कलेवरम्।**

**यः(फ्) प्रयाति स मद्भावं(य्ँ), याति नास्त्यत्र सं(म्)शयः ॥ 5 ॥**

जो पुरुष अंतकाळी ही माझेच स्मरण करीत शरीराचा त्याग करून जातो,तो साक्षात माझ्या स्वरूपाला प्राप्त होतो , यात मुळीच शंका नाही .

**यं(य्ँ) यं(व्ँ) वापि स्मरन्भावं(न्), त्यजत्यन्ते कलेवरम् ।**

**तं(न्) तमेवैति कौन्तेय, सदा तद्भावभावितः ॥ 6 ॥**

हे कुंतीपुत्र अर्जुना ! हा मनुष्य अंतकाळी ज्या ज्या भावाचे स्मरण करीत शरीराचा त्याग करतो , त्याला त्याला तो जाऊन मिळतो . कारण तो नेहमी त्याच भावाचे चिंतन करीत असतो .

**तस्मात्सर्वेषु कालेषु, मामनुस्मर युध्य च ।**

**मय्यर्पितमनोबुद्धिर्- मामेवैष्यस्यसं(म्)शयम् ॥ 7 ॥**

म्हणून हे अर्जुना !तू सर्व काळी निरंतर माझे स्मरण कर आणि युद्धही कर .अशाप्रकारे माझ्या ठिकाणी मन बुद्धी अर्पण केल्यामुळे तू निःसंशय मला असं मिळतील .

**अभ्यासयोगयुक्तेन, चेतसा नान्यगामिना ।**

**परमं(म्) पुरुषं(न्) दिव्यं(य्ँ), याति पार्थानुचिन्तयन् ॥ 8 ॥**

हे पार्था-असा नियम आहे की,परमेश्वराच्या ध्यानाच्या अभ्यासरूपी योगाने युक्त,दुसरीकडे न जाणाऱ्या चित्ताने निरंतरचिंतन करणारा मनुष्य परमप्रकाश स्वरूप दिव्य पुरुषाला म्हणजे परमेश्वरालाच जाऊन मिळतो .

कविं(म्) पुराणमनुशासितार-

मणोरणीयां(म्)समनुस्मरेद्यः ।

सर्वस्य धातारमचिन्त्यरूप-

मादित्यवर्णं(न्) तमसः(फ्) परस्तात् ॥ 9 ॥

जो पुरुष सर्व ज्ञ, अनादी, सर्वांचा नियामक, सूक्ष्माहूनही अतिसूक्ष्म, सर्वांचे धारण - पोषण करणारा, अतर्क्यस्वरूप, सूर्याप्रमाणे नेहमी चेतन प्रकाशरूप आणि अविद्येच्याअत्यंत पलीकडील अशाशुद्ध सच्चिदानंद घन परमेश्वराचे स्मरण करतो.

प्रयाण काले मनसाचलेन,

भक्त्या युक्तो योगबलेन चैव ।

भ्रुवोर्मध्ये प्राणमावेश्य सम्यक्-

स तं(म्) परं(म्) पुरुषमुपैति दिव्यम् ॥ 10 ॥

तो भक्ती युक्त पुरुष अंतकाळी सुद्धा योगबलाने भुवयांच्या मध्यभागी प्राण चांगल्या रीतीने स्थापन करून मग निश्चल मनाने स्मरण करीत त्या दिव्यरूप परमपुरुष परमात्म्यालाच प्राप्त होतो.

यदक्षरं(वँ) वेदविदो वदन्ति,

विशन्ति यद्यतयो वीतरागाः ।

यदिच्छन्तो ब्रह्मचर्यं(ञ्) चरन्ति,

तत्ते पदं(म्) सं(ङ्)ग्रहेण प्रवक्ष्ये ॥ 11 ॥

वेद वेदते विद्वान ज्या सच्चिदानंद घ नरूप परंपराला अविनाशी म्हणतात, असती नसलेले येत नसेल महात्मे ज्याच्यामध्ये प्रवेश करतात आणि ज्या परंपराची इच्छा करणारे ब्रह्मचारी ब्रह्मचर्याचे आचरण करतात, ते परमपद मी तुला थोडक्यात सांगतो.

सर्वद्वाराणि सं(यँ)यम्य, मनो हृदि निरुध्य च ।

मूर्ध्न्याधायात्मनः(फ्) प्राण- मास्थितो योगधारणाम् ॥ 12 ॥

ओमित्येकाक्षरं(म्) ब्रह्म, व्याहरन्मामनुस्मरन्।

यः(फ्) प्रयाति त्यजन्देहं(म्), स याति परमां(ङ्) गतिम् ॥ 13 ॥

सर्व इंद्रियांची द्वारे अडवून, मनाला हृदयाच्या ठिकाणी स्थिर करून,नंतर जिंकलेल्या मनाने प्राणमस्तका स्थापन करून ,परमात्मा संबंधी योग धारणेतस्थिर होऊन जो पुरुष ॐया एक अक्षररूप ब्रम्हाचा उच्चार करीत आणि त्याचे अर्थ स्वरूप निर्गुण ब्रह्म जो मी ,त्याचे चिंतन करीत देह टाकून जातो तो परमगतीला प्राप्त होतो .

अनन्यचेताः(स्) सततं(यँ), यो मां(म्) स्मरति नित्यशः ।
तस्याहं(म्) सुलभः(फ्) पार्थ, नित्ययुक्तस्य योगिनः ॥ 14 ॥

हे अर्जुना !जो पुरुष माझ्या ठिकाणी अनन्य चित्त होऊन नेहमी मज पुरुषोत्तमाचे स्मरण करतो , त्या नित्य माझ्याशी युक्त असलेल्या योग्याला मी सहज प्राप्त होणार आहे .

मामुपेत्य पुनर्जन्म, दुःखालयमशाश्वतम् ।
नाप्नुवन्ति महात्मानः(स्), सं(म्)सिद्धिं(म्) परमां(ङ्) गताः ॥ 15 ॥

परमसिद्धी मिळविलेले महात्मे एकदा मला प्राप्त झाल्यावर दुःखांचे आगर असलेल्या क्षणभंगुर पुनर्जन्माला जात नाही त .

आब्रह्मभुवनाल्लोकाः(फ्), पुनरावर्तिनोऽर्जुन ।
मामुपेत्य तु कौन्तेय, पुनर्जन्म न विद्यते ॥ 16 ॥

हे अर्जुना ! ब्रह्मलोकापर्यंतचे सर्व लोक पुनरावर्ती आहेत .परंतु हे कुंती पुत्रा ! मला प्राप्त झाल्यावरपुनर्जन्म होत नाही . कारण मी कालातीत आहे आणि हे सर्व ब्रह्मअधिकांचे लोक काला ने मर्यादित असल्याने अनित्य आहे त .

सहस्रयुगपर्यन्त- महर्यद्ब्रह्मणो विदुः ।
रात्रिं(यँ) युगसहस्रान्तां(न्), तेऽहोरात्रविदो जनाः ॥ 17 ॥

ब्रह्मदेवाचा एक दिवस 1000 चतर्युगांचारात्रही एक हजार चतुर्युगांची असते.जे योगी हे तत्वतः जाणतात ते काळाचे स्वरूप जाणणारे होत.

अव्यक्ताद्व्यक्तयः(स्) सर्वाः(फ्), प्रभवन्त्यहरागमे ।
रात्र्यागमे प्रलीयन्ते, तत्रैवाव्यक्तसञ्ज्ञके ॥ 18 ॥

सर्व चराचर भूत समुदाय ब्रह्मदेवाच्या दिवसाच्या आरंभी अव्यक्तापासून म्हणजे ब्रह्मदेवाच्या सुक्ष्म शरीरापासून उत्पन्न होतात आणि ब्रह्मदेवाच्या रात्रीच्या आरंभी त्या अव्यक्त नावाच्या ब्रह्मदेवाच्या सूक्ष्म शरीरात विलीन होतात .

भूतग्रामः(स्) स एवायं(म्), भूत्वा भूत्वा प्रलीयते ।
रात्र्यागमेऽवशः(फ्) पार्थ, प्रभवत्यहरागमे ॥ 19 ॥

हे पार्था !तोच हा भूत समुदाय पुन्हा पुन्हा उत्पन्न होऊन प्रकृतीच्या आधीन असल्यामुळे रात्रीच्या आरंभी विलीन होतो व दिवसाच्या आरंभी पुन्हा उत्पन्न होतो .

परस्तस्मात्तु भावोऽन्योऽ- व्यक्तोऽव्यक्तात्सनातनः ।
यः(स्) स सर्वेषु भूतेषु, नश्यत्सु न विनश्यति ॥ 20 ॥

त्या अव्यकताहूनफार पलीकडचा दुसरा अर्थात विलक्षण जो सनातन अव्यक्त भाव आहे ,तो परमदिव्य पुरुष सर्व भुते नाहीशी झाली तरी नाहीसा होत नाही .

अव्यक्तोऽक्षर इत्युक्तस्- तमाहुः(फ्) परमां(ङ्) गतिम् ।

यं(म्) प्राप्य न निवर्तन्ते, तद्धाम परमं(म्) मम ॥ 21 ॥

त्याला अभ्यक्त अक्षर असे म्हणतात , त्यालाच श्रेष्ठ गती म्हणतात .ज्या सनातन अभ्यक्त भावाला प्राप्त झाल्यावर मनुष्य परत येत नाही ,ते माझे सर्वश्रेष्ठ स्थान होय .

पुरुषः(स्) स परः(फ्) पार्थ, भक्त्या लभ्यस्त्वनन्यया ।

यस्यान्तः(स्)स्थानि भूतानि, येन सर्वमिदं(न्) ततम् ॥ 22 ॥

हे पार्थ! जिस परमात्मा के अंतर्गत सर्वभूत है और जिस सच्चिदानन्दघन परमात्मा से यह समस्त जगत् परिपूर्ण है, वह सनातन अव्यक्त परम पुरुष तो अनन्य भक्ति से ही प्राप्त होने योग्य है।

यत्र काले त्वनावृत्ति- मावृत्तिं(ञ्) चैव योगिनः ।

प्रयाता यान्ति तं(ङ्) कालं(वँ), वक्ष्यामि भरतर्षभ ॥ 23 ॥

हे अर्जुना !ज्या काळी शरीराचा त्याग करून गेलेले योगी परत जन्माला न येणाऱ्या गतीला प्राप्त होतात आणि ज्या काळी गेलेले परत जन्माला येणाऱ्या गतीला प्राप्त होतात ,तो काळ अर्थात दोन मार्ग मी सांगेन .

अग्निर्ज्योतिरहः(श्) शुक्लः(ष्), षण्मासा उत्तरायणम् ।

तत्र प्रयाता गच्छन्ति, ब्रह्म ब्रह्मविदो जनाः ॥ 24 ॥

ज्या मार्गात ज्योतिरमय अग्नीची अभिमानी देवता आहे ,शुक्ल पक्षाची अभिमानी देवता आहे आणि उत्तरायणाच्या सहा महिन्यांची अभिमानी देवता आहे ,त्या मार्गात मेल्यावर गेलेले ब्रह्मज्ञानी योगी वरील देवतांकडून क्रमाने नेले जाऊन ब्रह्माला प्राप्त होतात .

धूमो रात्रिस्तथा कृष्णः(ष्), षण्मासा दक्षिणायनम् ।

तत्र चान्द्रमसं(ञ्) ज्योतिर्-योगी प्राप्य निवर्तते ॥ 25 ॥

ज्या मार्गात धुराची अभिमानी देवता आहे ,रात्रीची अभिमानी देवता आहे ,कृष्ण पक्षाची अभिमानी देवता आहे आणि दक्षिणायनाच्या सहा महिन्यांची अभिमानी देवता आहे ,त्या मार्गात मेल्यावर गेलेला सकाम कर्म करणारा योगी वरील देवतांकडून नेला जातो . पुढे तो चंद्र तेजाला प्राप्त होऊन स्वर्गात आपल्या शुभ कर्मांची फळे भोगून परत येतो .

शुक्लकृष्णे गती ह्येते, जगतः(श्) शाश्वते मते ।

एकया यात्यनावृत्ति- मन्ययावर्तते पुनः ॥ 26 ॥

कारण जगाचे हे दोन प्रकारचे शुक्ल आणि कृष्ण अर्थात देवयान आणि पितृ यान मार्ग सनातन मानले गेले आहेत .यातील ज्या मार्गाने गेले असता परत यावे लागत नाही अशा मार्गाने गेलेला त्या परमगतीला प्राप्त होतो आणि दुसऱ्या मार्गाने गेलेला पुन्हा परत येतो म्हणजे जन्म मृत्यूला प्राप्त होतो .

नैते सृती पार्थ जानन्- योगी मुह्यति कश्चन ।

तस्मात्सर्वेषु कालेषु, योगयुक्तो भवार्जुन ॥ 27 ॥

हे पार्था !अशा रीतीने या दोन मार्गांना तत्वतः जाणल्यावर कोणीही योगी मोह पावत नाही .म्हणून हे अर्जुना !तू सर्व काळी समबुद्धी रूप योगाने युक्त हो अर्थात नेहमी माझ्या प्राप्तीसाठी साधन करणारा हो .

वेदेषु यज्ञेषु तपः(स्)सु चैव,

दानेषु यत्पुण्यफलं(म्) प्रदिष्टम्।

अत्येति तत्सर्वमिदं(वँ) विदित्वा,

योगी परं(म्) स्थानमुपैति चाद्यम्॥ 28 ॥

योगी पुरुष या रहस्याला तत्वतः जाणून,वेदांचे पठण ,यज्ञ ,तप,दान इत्यादी करण्याचे जे पुण्य फल सांगितले आहे त्या सर्वाला निसंशय ओलांडून जातो आणि सनातन परमपदाला पोहोचतो .

इति श्रीमहाभारते भीष्मपर्वणि श्रीमद्भगवद्गीतापर्वणि

श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां(यँ) योगशास्त्रे

श्री कृष्णार्जुनसं(वँ)वादे अक्षरब्रह्मयोगो नामाष्टमोऽध्यायः ॥ 8 ॥

ॐ पूर्णमदः(फ्) पूर्णमिदं(म्)पूर्णात्पूर्णमुदच्यते

पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ॥

ॐ शांतिः(श्) शांतिः(श्) शांतिः ॥

वह सच्चिदानंदघन परब्रह्म सभी प्रकार से सदा सर्वदा परिपूर्ण है। यह जगत भी उस परमात्मा से पूर्ण ही है, क्योंकि यह पूर्ण उस पूर्ण पुरुषोत्तम से ही उत्पन्न हुआ है। इस प्रकार परब्रह्म की पूर्णता से जगत पूर्ण होने पर भी वह परब्रह्म परिपूर्ण है। उस पूर्ण में से पूर्ण को निकाल देने पर भी वह पूर्ण ही शेष रहता है।